

# वाटीत एवढेसे, पाणी भरून ठेवा

आमच्या घराच्या गच्चीतून ताळगावची हिरवीगार सुंदर शेते दिसतात. मध्येच पाण्याची डबकी आहेत. अजून त्यांत पाणी साचलेले आहे. काही म्हशी त्यांच्यात डुंबलेल्या असतात. हे दृश्य आम्हाला काझीरंगाची आठवण करून देते. दुरून ह्या म्हशी तिथल्या एकशिंगी गेंड्यांसारख्याच दिसतात.

दोन दिवसांपूर्वी सकाळी नऊच्या सुमारास मी या शेतांकडे पाहात उभे होते. एवढ्यात पक्ष्यांचा एक थवा खाली उतरला. शेतात असलेल्या लहानलहान तळ्यांजवळ ते पक्षी फिरू लागले. मी दुर्बिणीतून पाहू लागले. अजून काही पक्षी खाली उतरतच होते. पांढऱ्या मानेचे करकोचे, छोटा क्षत्रबलाक (लेसर ॲडजुटंट), काळा शराटी (आयबीस), मोर शराटी, काळ्या डोक्याचा शराटी कितीतरी पक्ष्यांच्या प्रजाती तिथे होत्या.

त्यांना पाण्याजवळ फिरताना बघून काही दिवसांपूर्वी वाचलेली एक कविता मला आठवली. कवीचे नाव आठवत नाही.

*'सरली सुरेख थंडी, फोफावला उन्हाळा,*
*संतप्त सूर्य आता, ओकेल तप्त ज्वाळा.*

*पक्षी दिशा दिशांना,फिरतील ते थव्यांनी,*
*सुकतील कंठ त्यांचे, मग शोधतील पाणी.*

*सुकली तळी जळाची, पाणी पिण्यास नाही,*
*त्या सानुल्या जीवांची, होईल लाही लाही.*

*त्यांच्या जीवाकरिता, इतकी कराच सेवा,*
*वाटीत एवढेसे, पाणी भरून ठेवा'.*

उन्हाळा असह्य होऊ लागला की पक्षी पाण्याच्या शोधार्थ फिरू लागतात. दुर्दैवाने यावेळी सगळीकडे पाण्याचे झरे, पाण्याचे स्रोत आटलेले असतात. या पक्ष्यांची खूप कासाविशी होते. त्यांना पिण्यासाठी आणि आंघोळीसाठी पाणी लागते. उन्हाळ्याच्या दिवसात शरीर थंड ठेवण्यासाठी बहुतेक पक्षी आंघोळ करतात. पण काही पक्षी, विशेषतः किडे आणि कुजलेले मांस खाणारे, इतर ऋतूतही आंघोळ करतात.



काही वर्षांपूर्वी आम्ही घराच्या गच्चीवर छप्पराखाली बसलो होतो. सोबत काही मित्र होते. धोधो पाऊस पडत होता. गरम गरम चहा आणि कांदेभजी खात आम्ही पावसाचा आनंद लुटत होतो. एवढ्यात दयाळ (रॉबिन) पक्षांची एकजोडी आली. गच्चीवर ठेवलेल्या पक्षीस्नान पात्रात (बर्डबाथ) एक जण उतरला. दुसरा त्याच्या काठावर बसला. पहिल्याची मनसोक्त आंघोळ झाल्याबरोबर तो दुसऱ्या काठावर जाऊन बसला. दुसरा रॉबिन पाण्यात उतरला. मनसोक्त न्हाऊन घेतले आणि ते निघून गेले. आम्ही हा स्नानसोहळा डोळे भरून पाहून घेतला.

पण एवढ्यावर गोष्ट संपली नाही. तर अगदी दोन-चार मिनिटांतच, बहुतेक हीच रॉबिनची जोडी, अजून एका जोडीला सोबत घेऊन आली. एक जोडी गच्चीच्या कठड्यावर बसली. दुसरीने पहिल्या जोडीने केलेल्या स्नानाचे अनुकरण केले. हा स्नानसोहळा अजूनही आमच्या डोळ्यांसमोर जसेच्या तसा येतो आहे.

कित्येक वर्षांपासून आम्ही पक्ष्यांसाठी पक्षी घंगाळ ठेवतो. विद्या-मुग्धाने काही वर्षांपूर्वी दिलेला असाच एक बर्डबाथ आम्ही अजूनही वापरतो. एक ह्या दोस्तांची आठवण आणि दुसरी रॉबिनच्या स्नानसोहळ्याची. अशा छोट्या छोट्या गोष्टींतून आपण केवढा आनंद मिळवू शकतो. नुसता आनंद नाही तर पक्षीसंवर्धनात फूल ना पाकळी या रितीने लागलेला आपला हातभार किती समाधानकारक आहे! निसर्गसंवर्धनाचे हे पुण्य आपण इतक्या सोप्या रितीने मिळवू शकतो.

आम्ही ठेवलेल्या या पक्षीकुंडांनी आम्हाला अनेक सुखकारक आठवणी दिल्या. दोन-तीन कावळे रोज सकाळी आणि संध्याकाळी पावाचा तुकडा घेऊन येतात. पाण्यात बुडवून खातात. हे खरे गोंयकार. एका दुपारी मी वरच्या मजल्यावर खोलीत आराम करत होते. साडेतीन-पावणेचार वाजता फडफड ऐकू आली म्हणून बाहेर जाऊन पाहिले तर एक कावळा पक्षीथाळीत डुंबत होता. पंख फडफडवून मस्त आंघोळ करत होता. काही दिवस पाळत ठेऊन बघितले तर रोज त्याच वेळी, साडेतीन-पावणेचार वाजता, त्याची आंघोळ व्हायची.



असा अनेक पक्ष्यांनी आपल्या स्नानसोहळ्याचा आनंद आम्हाला उपभोगविला आहे. बागेत ठेवलेल्या पाखरपात्रात कधीकधी एक पाणकोंबडी स्नान करताना दिसते. हा स्नानसोहळा खूप सुखदायी अनुभव आहे. कधीकधी तर धनेशही (हॉर्नबिल) पाणी पिण्यासाठी वरच्या मजल्यावर असलेल्या गच्चीत आम्हाला भेट देतात. गच्चीवर किंवा बाहेरच्या अंगणात एखाद्या उथळ भांड्यात थोडे पाणी ठेवून आपण हा आनंद सहज घेऊ शकतो.

तर गोष्ट सांगत होते समोरच्या शेतात आलेल्या पक्ष्यांची. पांढऱ्या मानेचे करकोचे (वुली नेक्ड स्टॉर्क),



छोटा क्षत्रबलाक (लेसर ऍडजुटंट), काळा शराटी (आयबीस), मोर शराटी, काळ्या डोक्याचा शराटी, बगळे (छोटा, मध्यम, मोठा, गायबगळा, राखी, जांभळा) अशा कितीतरी पक्ष्यांच्या प्रजाती तिथे आल्या होत्या. यापैकी काही प्रजाती आइ यु सी एन च्या (IUCN) चिंताजनक श्रेणीत वर्गीकृत केलेल्या आहेत. हे प्राणी सहसा शेत, उथळ पाणी, दलदल किंवा पाणथळीच्या जागी सापडतात. उन्हाळ्यात सगळीकडे पाणी सुकून जाते. त्यामुळे जेथे थोडेथोडे पाणी त्यांना सापडते तेथे हे जातात. मात्र गेल्या वर्षी आलेले चित्रबलाक किंवा रंगीत करकोचे (पेंटेड स्टॉर्क) या वर्षी दिसले नाहीत.

दुर्बिणीतून पाहताना दोन–तीन क्षत्रबलाक एका कडेला गेलेले दिसले. तेथे एकीकडे बांधकामाच्या कचऱ्याचा, अवशेषांचा ढिगारा टाकलेला दिसतो. येथे हे ढिगारे अनेक वर्षांपासून टाकले जात आहेत, कधीकधी रात्रीच्या वेळी येथे काम चालते. त्यामुळे ही शेते बुजली जातात. याचा पर्यावरणावर फार वाईट परिणाम होतो. हे ऍडजुटंट जणू हताशपणे ह्या ढिगाऱ्यांकडे बघत होते. जणू ते विनंती करत होते कि 'आम्हाला वाचवा. आमच्यासाठी राहिलेली ही काही शेते आमचा अखेरचा अधिवास आहे'.



पृथ्वी केवळ मानवासाठी नाही. बाकीच्या जीवसृष्टीला येथे जगायचा अधिकार आहे. तो आपण त्यांच्यापासून हिरावून घेता कामा नये. आपली भारतीय संस्कृती भोवतालच्या संपूर्ण जीवसृष्टीला आपल्या कुटुंबात सामावून घेते. ही जाणीव आपण ठेवली तर पृथ्वीतलावर सगळीकडे नंदनवन फुलायला जास्त वेळ लागणार नाही.

◆

**डॉ. संगीता सोनक**
sangeeta.sonak@gmail.com